प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

मे 4, 2018

**तुमकुर ग्रेन मर्चन्टस् को-ऑपरेटिव बँक लि., तुमकुर, कर्नाटक ह्यांना आर्थिक दंड लागु.**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46 (4) सह वाचित, कलम 47अ(1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, तुमकुर ग्रेन मर्चन्टस् को-ऑपरेटिव बँक लि., तुमकुर, कर्नाटक ह्यांना, रु.5.0 लाख (रुपये पाच लाख) दंड लावला आहे व हा दंड, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निकष/अँटी-मनी लाँडरिंग मानके (एएमएल)/आर्थिक दहशतवादाशी सामना करणे (सीएफटी)/पीएमएलए 2002 खालील बँकेची दायित्वे ह्यावरील, आरबीआयने दिलेल्या महापरिपत्रक डीबीआर.एएमएल.बीसी.क्र.15/14.01.001/2015-16 दि. जुलै 1, 2015 मधील परिच्छेद 3.2.2.4.डी मध्ये दिलेल्या सूचनांचे/मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्याने लागु करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने एक लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँकेने निर्णय घेतला की उल्लंघने झाली असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/2912**